# प्रेसनोट

दि.०२/१२/२०२१

**सांगवी पोलीस स्टेशन येथील महिला पोलीस उपनिरीक्षक व सहायक पोलीस उपनिरीक्षकावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७, ७अ, १२<br>भारतीय दंड संहिता कलम - २७९ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ४२ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक – (१) हेमा सिदराम सोळुंके, वय - २८ वर्षे,<br>पद - महिला पोलीस उप निरीक्षक<br>(२) अशोक बाळकृष्ण देसाई,<br>पद - सहायक पोलीस उपनिरीक्षक,<br>नेमणुक सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,००,०००/- (एक लाख रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ७०,०००/- (सत्तर हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- २५/११/२०२१ व दिनांक २६/११/२०२१

सापळा दिनांक - ०२/११/२०२१

ठिकाण:- औंध जिल्हा रूग्णालयाचे समोर

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे विरूद्ध सांगवी पोलीस स्टेशन येथे तक्रार अर्ज दाखल आहे. सदर तक्रार अर्जाची चौकशी आरोपी लोकसेवक क्रमांक १ पो.उपनि.सोळुंके यांचेकडे असून अर्जावरून बलात्काराचा गुन्हा दाखल न करण्यासाठी आरोपी लोकसेवक क्रमांक १ यानी तक्रारदार यांचेकडे १,००,०००/- रूपये लाचेची मागणी केली म्हणून तक्रारदार यांनी ए.सी.बी.कडे तक्रार दिली होती. त्याअनुषंगाने दिनांक २५/११/२०२१ व दि. २६/११/२०२१ रोजी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक क्र. १ यांचे सांगणेवरून आरोपी लोकसेवक क्रमांक २ सहा.पो.फौ. देसाई यानी १,००,०००/- रूपयांची लाचेची मागणी करून तडजोडीअंती ७०,०००/- रूपये लाचेची मागणी केली.

आज दिनांक ०२/१२/२०२१ रोजी लाच रक्कमेसह तक्रारदार यांना पाठविले असता आलोसे क्र. २ याने लाच स्वीकारली व त्यावेळी त्यास ताब्यात घेणेसाठी सापळा पथक पुढे सरसावले असता त्याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल बेदरकारपणे चालवून लाच रक्कमेसह पळून गेला आहे. यातील लाच मागणी व स्वीकार या कृत्यास आलोसे क्र. १ यानी साहाय्य केले आहे. आरोपी लोकसेवक क्रमांक १ -महिला पोलीस उप निरीक्षकास ताब्यात घेण्यात आले आहे. सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस उप अधीक्षक सीमा आडनाईक, तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.